# 'दूरशिक्षण'च्या ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रियेस सुरुवात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रांतर्गत सातारा व सांगली या दोन विभागीय केंद्रासह ७७ अभ्यासक्रमामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त बी.ए., बी.कॉम., एम.ए.(भाषा), एम.ए. (सामाजिक शास्त्रे), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेशासाठी सोमवार (दि. १७) पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.

दूरशिक्षण विभागातर्फे चालू शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. अभ्यासक्रमासाठी नियमित शुल्कासह दि. २५ जुलै, विलंब शुल्क दि. १० ऑगस्ट व अतिविलंब शुल्काने दि. २५ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येतील.



शिवाजी विद्यापीठातून...

इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश व परीक्षा अर्ज online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर उपलब्ध आहे. नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यापूर्वी यूजर आयडी व पासवर्ड तयार करून रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. अधिक माहितीसाठी दूरशिक्षण केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले आहे.

**मटा अँकर** सायबर सिक्युरिटी, नॅनो फॅब्रिक, व्हीएलएसआय सेंटरद्वारे विद्यापीठ आघाडीवर

# राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेत विद्यापीठाचे देशात पहिले पाऊल

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना जागतिक ज्ञानअवकाश खुले व्हावे या ध्येयातून कार्यान्वित केलेल्या तीन योजनांमुळे शिवाजी विद्यापीठ माहिती तंत्रज्ञानातील जागतिक संशोधनाच्या यादीत गेले आहे. स्मार्ट तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे विविध क्षेत्रांतील सुरक्षा धोक्यात आली आहे. यासाठी केंद्रस्तरावर संरक्षणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत उभारलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनात शिवाजी विद्यापीठानेही राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. सायबर सिक्युरिटी सेंटर, नॅनो फॅब्रिक्स सेंटर आणि सेंटर फॉर व्हीएलएसआय या राष्ट्रीयस्तरावरील तीन योजनांमध्ये विद्यापीठाने आघाडी घेतली आहे.

> “शिक्षणाला संशोधनाची जोड मिळणे ही नव्या काळाची गरज बनली आहे. त्यादृष्टीने नव्या गरजा ओळखून राष्ट्रीय स्तरावर ज्या योजना आखल्या जात आहेत त्यात शिवाजी विद्यापीठाचा धागा जोडला जाणे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. राष्ट्रीय पातळीवरील केंद्रांसाठी काम करताना विद्यापीठाची सक्षमता वेगळ्या अर्थाने नोंद होत आहे.
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो सायन्सवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक कापड निर्मितीसंदर्भात देशपातळीवर संशोधन सुरू आहे. भविष्यात कपड्यांची निर्मिती या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केली जाणार असून यात विद्यापीठातील केंद्राद्वारे होणाऱ्या संशोधनाचे योगदान असेल, असे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी सांगितले.

'सुरक्षायंत्रणा सतर्क करण्यासाठी देशपातळीवर स्वतःची जीपीएस प्रणाली कार्यान्वित केली जात आहे. यात अंतराळ संशोधनात कार्यरत 'इस्रो'सारख्या संस्थेच्या नेतृत्वाखाली देशाची जीपीएस यंत्रणा उभारणारी उपग्रह मालिका अवकाशात प्रक्षेपित करण्यात आली आहे. या उपग्रह मालिकेच्या कामात विद्यापीठाने योगदान दिले असून पन्हाळा येथील अवकाश केंद्रामध्ये त्यासाठीचा रिसिव्हर बसवण्यात आला आहे. या रिसीव्हरच्या कक्षेत सुमारे एक हजार एरियल स्पेस मिळत असल्यामुळे विद्यापीठाच्या केंद्रावर इस्रोमधील शास्त्रज्ञांना काम करण्यास विशेष संधी मिळाली आहे. देशातील १३ पैकी एक रिसीव्हर बसवलेले देशातील हे एकमेव विद्यापीठ आहे. या सेंटरच्या माध्यमातून देशाच्या संरक्षणदलाच्या नेतृत्वाखाली काही महत्त्वाच्या चिप्स बनवण्याचे काम करण्यात येत आहे. या रिसिव्हरमुळे विद्यापीठाचे अवकाश केंद्र 'इस्रो'च्या नकाशावर दाखल झाले आहे,' असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

ते म्हणाले, 'देशातील पहिले सायबर सिक्युरिटी केंद्र स्थापण्याची संधीही विद्यापीठाला मिळाली आहे. तीन वर्षांत दोन हजार सायबर सिक्युरिटी क्षेत्रात तज्ज्ञ घडवण्याची जबाबदारी या केंद्राच्या माध्यमातून आली आहे. पहिल्या वर्षातच एक हजार प्रशिक्षक तयार केले आहेत. देशात सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रम हा जागतिक पातळीवर तयार होत असून यामध्ये विद्यापीठाच्या सुचना व अहवाल महत्त्वाचा मानला जाईल. स्मार्ट फोन हॅक करून सुरक्षेला छेद देण्याचे प्रकार रोखण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर सायबर सिक्युरिटीला महत्त्व आले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाला देशातील पहिले सायबर सिक्युरिटी केंद्र स्थापण्याची मिळालेली संधी हा राष्ट्रीय सन्मान आहे.'

# विद्यापीठ उन्हाळी सत्रातील २८६ परीक्षांचे निकाल जाहीर

## २५० परीक्षांचे निकाल प्रलंबित; १ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी सत्रातील सुमारे २८६ निकाल जाहीर झाले आहेत. इंजिनिअरिंग, लॉ, फार्मसी आदी २५० परीक्षांचे निकाल अद्याप प्रलंबित आहेत.

विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्र घेण्यात आल्या. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातून सुमारे १ लाख ७५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. ६४३ पैकी २८६ परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. यात ३० दिवसांत २३० परीक्षा, ४५ दिवसांत ४५ परीक्षा व ४५ दिवसांनंतर ११ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

लोकसभा निवडणुकांसाठी कर्मचारी गेल्याने काही परीक्षा दोन आठवडे पुढे गेल्या आहेत. इंजिनिअरिंग, लॉ, फार्मसी या उशिरा झालेल्या परीक्षांचे निकाल मे महिन्याच्या अखेरीस लागणार आहेत, तर एमएड, बीएबीएड (एकात्म) या परीक्षा अद्याप सुरू आहेत.

> बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. या परीक्षांचे कॅप वेगळे करण्यात आले. याचा उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपयोग झाला. एकाही परीक्षेचा निकाल उशिरा लागलेला नाही. ज्या परीक्षा उशिरा झाल्या आहेत, त्यांचाही निकाल वेळेत लावण्यासाठी प्रयत्न आहेत.
>
> **- महेश काकडे, संचालक,**
> परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# अभियांत्रिकी पदवी प्रवेशप्रक्रिया सुरू

**गडहिंग्लज, ता. १७ :** राज्य सामाईक प्रवेशपूर्व परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवी प्रवेशप्रक्रिया आजपासून राज्यभरात सुरू झाली. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शुक्रवार (ता. २१) अखेर अर्ज करण्याची मुदत आहे. मंगळवारी (ता. २५) पक्की गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. सीईटी सेलने या संदर्भातील सविस्तर वेळापत्रक जाहीर केले आहे. खुल्या वर्गासाठी ८०० रुपये, तर मागासवर्गीयासाठी ६०० रुपये प्रवेश अर्जाची किंमत आहे. विद्यार्थ्यांनी www.mahacet.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावयाचे आहेत. शुक्रवारअखेर विद्यार्थ्यांनी सुविधा केंद्रात जाऊन आपापली मूळ गुणपत्रके छाननी करून घ्यावयाची आहेत. शनिवारी (ता. २२) कच्ची गुणवत्ता यादी जाहीर होईल. यावर आक्षेप नोंदविण्यासाठी दोन दिवसांची मुदत आहे.

**दृष्टिक्षेपात कॅप राऊंड**

- पहिला- २६ ते २८ जून
- दुसरा- ६ ते ८ जुलै
- तिसरा- १६ ते १८ जुलै
- अनुदानित आणि शासकीय महाविद्यालयासाठी जादा फेरी- २५ जुलै ते ५ ऑगस्ट.

# डॉ. पवार, डॉ. जाधव यांना शाहू पुरस्कार

## राजर्षी शाहू सामाजिक सलोखा मंचातर्फे गुरुवारपासून परिषद



डॉ. पवार



डॉ. जाधव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : राजर्षी शाहू सामाजिक सलोखा मंच व अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे 'राजर्षी' पदवी शताब्दीनिमित्त गुरुवारी (ता. २०) राजर्षी कृतज्ञता परिषद होत आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार व डॉ. रमेश जाधव यांना राजर्षी शाहू विचार पुरस्कार देण्यात येणार आहे.

दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, डॉ. टी. एस. पाटील, माजी महापौर भिकशेट पाटील, सतीश रणदिवे, डॉ. पद्मा पाटील, शाहूभक्त (कै.) गंगाराम कांबळे कुटुंबीय यांना राजर्षी शाहू विशेष सन्मान, तर शाहूकालीन संस्था, वसतिगृह, संशोधन केंद्र व शाहू विचाराने कार्यरत संस्थांचा राजर्षी शाहू सन्मानपत्र देऊन गौरव केला जाणार आहे, अशी माहिती मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंत मुळीक यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये सायंकाळी साडेपाचला कार्यक्रम होईल.

श्री. मुळीक म्हणाले, की छत्रपती शाहू महाराज यांना कानपूर (उत्तर प्रदेश) येथे 'राजर्षी' पदवी प्रदान करण्यात आली. त्यानिमित्त राजर्षी कृतज्ञता परिषदेचे आयोजन केले आहे. त्यासाठी अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष एल. पी. पटेल व अन्य पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. परिषदेत डॉ. पवार व डॉ. जाधव यांना पुरस्काराने सन्मानित केले जाईल. या दोघांनी शाहू महाराजांवर केलेले संशोधन लक्षात घेता त्यांची पुरस्कारासाठी निवड केली आहे.

ते म्हणाले, "डॉ. पवार यांचे इतिहास परिषदांमध्ये व संशोधनपर नियतकालिकात पंचेचाळीसहून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. ते महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे संस्थापक संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी संपादित केलेला राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ कन्नड कोकणी, इंग्लिश, जर्मन, उर्दू व तेलुगू भाषेत अनुवादित झाला आहे.' ते म्हणाले, 'डॉ. जाधव शहाजी छत्रपती महाविद्यालय व न्यू कॉलेजमध्ये सेवेत होते. ते २००८ मध्ये निवृत्त झाले असले तरी आजही शाहू संशोधन कार्यात व्यस्त आहेत.

### राजर्षी पदवी शताब्दीनिमित्त उपक्रम असे :

- **२० जून :** सकाळी १० ते दुपारी २- कुर्मी बांधवांबरोबर शाहू जन्मस्थळ, न्यू पॅलेस भेट
- **२१ जून :** १० ते ४- शाहू समाधी स्थळ, जुना राजवाडा भेट
- **२३ जून :** १० ते रात्री ८- शाहूचित्र प्रदर्शन (राजर्षी छत्रपती शाहू स्मारक कलादालन)
- **२५ जून :** सायंकाळी ७- अग्निदिव्य शाहूंच्या जीवनावरील वैचारिक नाटक (संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह)
- **२६ जून :** सकाळी ८- राजर्षी शाहू जयंती
- **३० जून ते १५ जुलै :** शाहू जीवनावर आधारित जिल्हास्तरीय शालेय विद्यार्थी वक्तृत्व, निबंध, चित्रकला स्पर्धा

# पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी 'सकाळ'चा पुढाकार महत्त्वपूर्ण

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; 'सकाळ' कार्यालयास भेट

कोल्हापूर, ता. १७ : 'सकाळ'ने पंचगंगा नदी प्रदूषणमुक्तीसाठी घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण आहे,' या शब्दांत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज 'सकाळ'चे कौतुक केले. जनशिक्षण महत्त्वाचे असून, त्याद्वारे समाजात बदल घडविता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कुलगुरूपदाच्या कारकीर्दीस चार वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांनी 'सकाळ' कार्यालयास आज भेट दिली, त्या वेळी ते बोलत होते. 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक-संचालक श्रीराम पवार यांनी त्यांचे स्वागत केले.

डॉ. शिंदे यांनी 'सकाळ'ने पंचगंगा नदी प्रदूषणमुक्तीसाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले. नदीकाठावरील गावांसाठी केलेले काम महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट करत ओनरशीप डेव्हलप करणे हे आव्हान असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी जपान, थायलंड, चीन, दक्षिण कोरिया या देशांच्या भेटीदरम्यान आलेले अनुभव सांगितले. स्वयंशिस्त हा महत्त्वाचा भाग असून, तो प्रत्येकाने आत्मसात केला पाहिजे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

या प्रसंगी डॉ. शिंदे यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' हा ग्रंथ संपादक-संचालक श्री. पवार व निवासी संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड यांना भेट दिला. यावेळी निवासी संपादक (सेवाभक्ती) निखिल पंडितराव व जनसंपर्काधिकारी डॉ. अलोक जत्राटकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'शिवाजी द ग्रेट' हा ग्रंथ सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार व निवासी संपादक डॉ. श्रीरंग गायकवाड यांना भेट दिला. शेजारी जनसंपर्काधिकारी डॉ. अलोक जत्राटकर. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)**